"**मा.बाळासाहेब ठाकरे** स्मृती मातोश्री
ग्रामपंचायत बांधणी योजना सुरू करणे बाबत."

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः ग्रापंई २०१७/प्र.क्र.२४६ /बांधकाम-४**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
तारीख: २३ जानेवारी,२०१८

वाचा :-

**१) शासन निर्णय क्रमांकः ददभू-२०१०/प्र.क्र.६२ /पंरा -६ दि .१६ सप्टेंबर, २०१०**
**२) शासन निर्णय क्रमांक- रागांप-२०१२/प्र.क्र.९२/योजना-४ दि. ०३ मार्च २०१४**
**३) शासन निर्णय क्रमांकः जीपीडीपी- २०१५/प्र.क्र.३८ /पंरा -६ दि .०४ नोव्हेंबर, २०१५**
**४) शासन निर्णय क्रमांक- विकास २०१५/प्र.क्र.२७४/यो- ६ दि. १६ डिसेंबर, २०१५**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रामध्ये आजमितीस एकूण २८,००६ ग्रामपंचायती, ३५१ पंचायत समित्या व ३४ जिल्हा परिषदा कार्यरत आहेत. ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायतराज संस्थांकडे राज्य शासनाने विविध योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी सोपविलेली आहे. या पंचायतराज संस्थांमध्ये सध्या १,९७,३३८ ग्रामपंचायत सदस्य, ४,००४ पंचायत समिती सदस्य व २,००२ जिल्हा परिषद सदस्य कार्यरत आहेत. राज्यातील एकूण २८,००६ ग्रामपंचायतीपैकी जवळपास ४,२५२ ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही. या ग्रामपंचायतींपैकी बहुतांश ग्रामपंचायती या लोकसंख्येने लहान, आर्थिक दृष्टया कमकुवत अथवा दुर्गम भागातील आहेत. केंद्र शासनाच्या राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियाना अंतर्गत ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी मिळणारा निधी सन २०१५-१६ पासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे, तसेच ग्रामीण भागासाठी पायाभूत सुविधांची असणारी आवश्यकता व त्यासाठी उपलब्ध असणाऱ्या स्त्रोतांची उणीव लक्षात घेऊन " मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना " ही नवीन योजना सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

१. राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना खालील अटींच्या अधीन राहून सुरू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(१) मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नसलेल्या व १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या

ग्रामपंचायतींना ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी सार्वजनिक- खाजगी - भागीदारी (PPP) च्या धर्तीवर अथवा शासनाच्या प्रस्तुत योजनेतून ग्रामपंचायत कार्यालय बांधावयाचे आहे, याबाबत ग्रामसभेने ठराव करावा. शासनाच्या प्रस्तुत योजनेतून ग्रामपंचायत कार्यालय बांधावयाचे झाल्यास त्याचे मुल्य रु. १२.०० लक्ष इतके निर्धारीत करण्यात आले असून, त्यापैकी ९० % प्रमाणे रुपये १०.८० लक्ष इतकी रक्कम शासनामार्फत व उर्वरीत १०% प्रमाणे रु.१.२० लक्ष इतकी रक्कम ग्रामपंचायतीने स्व-निधीतून खर्च करावा.

(२) १००० ते २००० पर्यत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींनी स्वत:चे ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी सार्वजनिक- खाजगी -भागीदारी (PPP) च्या धर्तीवर बांधकाम करण्याबाबत किमान दोन वेळा प्रयत्न करावा. सार्वजनिक- खाजगी -भागीदारी (PPP) च्या धर्तीवर ग्रामंपचायत कार्यालय बांधण्यास प्रतिसाद न मिळाल्यास, प्रस्तुत योजनेतून सदर बांधकामासाठी रु. १८.०० लक्ष इतके मूल्य निर्धारीत करण्यात आले आहे. त्यापैकी ९० % प्रमाणे रुपये १६.२० लक्ष इतकी रक्कम शासनामार्फत व उर्वरीत १०% प्रमाणे रु.१.८० लक्ष इतकी रक्कम ग्रामपंचायतीने स्व-निधीतून खर्च करावा.

(३) २००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींनी त्यांच्या ग्रामपंचायतीचे कार्यालय स्व-निधीतून अथवा सार्वजनिक- खाजगी -भागीदारी (PPP) च्या धर्तीवरच बांधकाम करावे.

(४) ज्या ग्रामपंचायतीने सार्वजनिक- खाजगी- भागीदारी (PPP) द्वारे बांधकाम करण्याची निवड ग्रामसभेद्वारे केली आहे, अशा सर्व ग्रामपंचायतींनी त्यांची ग्रामपंचायत कार्यालये सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) या धर्तीवर बांधकाम करावे. या करीता शासनाकडून कोणताही निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही.

२. शासकीय-खाजगी भागीदारीतून बांधकाम करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यतेने स्वतंत्र धोरण निर्गमित करण्यात येईल.

३. सद्यस्थितीत स्वत:चे ग्रामपंचायत कार्यालय नसलेल्या कोणत्याही ग्रामपंचायतीचे बांधकाम दोन वेगवेगळया योजनेतून मंजुर होणार नाही याची संबंधीत जिल्हा परिषदेने दक्षता घ्यावी.

४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ग्रामपंचायत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रथमत: प्रयत्न करण्यात यावा. त्यानंतर, ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी अतिरीक्त निधीची आवश्यकता असल्यास या योजनेअंतर्गत ग्रामपंचायत बांधकामासाठी निधी उपलब्ध

करुन देण्यात येईल. प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या निधीच्या मर्यादेत प्रस्तुत योजनेतून ग्रामपंचायत बांधकामासाठी ग्रामपंचायतींची निवड करण्यात येईल.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. १२/२०१८, व्यय १५, दि. २०.०१.२०१८ अन्वये त्यांच्या सहमतीने व मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१८०१२२१५२२३६०६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

R A Nagargoje

Digitally signed by R A Nagargoje
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=decff3a81eacee2237c8c2d29460e7c459d9f7baaab677f7578d952747d49ab2, cn=R A Nagargoje
Date: 2018.01.23 10:24:42 +05'30'

(र.आ.नागरगोजे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
६) मा.सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक
७) सर्व विभागीय आयुक्त
८) सर्व जिल्हाधिकारी
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
१०) सर्व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११) सर्व कार्यकारी अभियंता (बांध), जिल्हा परिषद
१२) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद
१३) सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी ग्राम विकास विभाग
१४) वित्त विभाग (व्यय १५/अर्थसंकल्पीय-१७) , मंत्रालय, मुंबई
१५) नियोजन विभाग (कार्यासन- १४४४), मंत्रालय, मुंबई
१६) आदिवासी विभाग , मंत्रालय, मुंबई
१७) निवड नस्ती कार्यासन बांध-४